Impact Factor
5.604
www.sjifactor.com

ISSN p-2454-7409
Vol. 5 Issue 1
Jan. 2020
Regular Issue

डॉ. भाऊ मांडवकर संशोधन केंद्र व
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ मराठी प्राध्यापक परिषद यांचा संयुक्त उपक्रम

वर्ष पाचवे अंक पहिला जानेवारी २०२०

# मराठी प्राध्यापक संशोधन पत्रिका

www.researchjournal.net.in
www.indiramahavidyalaya.com

**Peer Reviewed Annual National Indexed Research Journal in Marathi**

**Published as per UGC (India) Guidelines**

मराठी भाषा,साहित्य, संस्कृती व अस्मिता जोपासणारे
मराठी विषयाचे प्राध्यापक, संशोधक आणि अभ्यासक यांच्या
संशोधनकार्याला चालना देणारे वार्षिक

Published By
**DBMRC**
**INDIRA MAHAVIDYALAYA**
KALAMB, DISTT. YAVATMAL, MAHARASHTRA 445 401 (India)

# अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| | संपादकीय | डॉ. पवन मांडवकर | 4 |
| 1 | सण उत्सवाच्या स्त्री लोकगीतांमधून उमटणारी देशीयता | डॉ. अतुल चौरे | 5-9 |
| 2 | मूर्तिपूजा राष्ट्रसंतांचा दृष्टिकोन | डॉ. प्रवीण कारंजकर | 10-12 |
| 3 | संत सावता माळी | डॉ. व्यंकटेश पोटफोडे | 13-16 |
| 4 | महादेवाच्या गाण्यातील सामाजिक, सांस्कृतिक व भौगोलिक संदर्भ | डॉ. न.ह. खोडे | 17-21 |
| 5 | घर याचे हृदयी माझ्या : सामाजिक, सांस्कृतिक आशय सांगणारी कविता | प्रा. मिलिंद भिवाजी कांबळे | 22-24 |
| 6 | भारतीय भक्ती चळवळ आणि लोकभाषा यांचा अनुबंध | डॉ. उज्ज्वला वंजारी | 25-27 |
| 7 | संत तुकडोजी महाराजांच्या ग्रामगीतेतील प्रारब्धवाद | डॉ. रेखा वडिखाये | 28-31 |
| 8 | स्वाती चांदोरकरांच्या कथेन्रील नियती शरण नायिकांचे चित्रण | प्रा. डॉ. विठ्ठल नामदेव रोटे | 32-34 |
| 9 | मराठी भाषेवरील फार्सी भाषेचा प्रभाव : एक अनुबंध | प्रा.डॉ. लिंगायत विशाल प्रकाश | 35-38 |
| 10 | मराठी साहित्यात प्रतिबिंबित 'मानवतावाद' | प्रा.डॉ. विजय रूपराव राऊत | 39-43 |
| 11 | समन्वयकार संत नामदेव महाराज | डॉ. अशोक भक्ते | 44-48 |
| 12 | आदिवासी साहित्य आणि श्रमसंस्कृती | प्रा.डॉ. कृष्णा महादू भवारी | 49-52 |
| 13 | वेदनेतून निर्माण होऊन विद्रोहांकडे जाताना स्वत:चे अस्तित्व निर्माण करणारा प्रतिभेचा प्रवाह म्हणजे दलित साहित्य | डॉ. रमाकांत विठ्ठल ईटेवाड | 53-57 |
| 14 | वैदर्भीय संतांचे पसायदान आणि त्यांचे युगभान | डॉ. संजय नी. पाटील | 58-62 |
| 15 | शंकर पाटील यांचा 'गारवेल' कथासंग्रह एक आकलन | प्रियंका आकाश राऊत | 63-66 |
| 16 | विलास अंभोरे यांच्या कादंबरीतील स्त्री व्यक्तिरेखा | प्रा. तुकाराम कांबळे | 67-69 |
| 17 | नव्वदोत्तरी कादंबरीतील वास्तव स्त्रीजीवन (सदानंद देशमुख यांच्या 'तहान' व 'बारोमास' संदर्भात ) | डॉ. वर्षा गणगणे | 70-73 |
| 18 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक विचारांचा आढावा | प्रा. डॉ. संजय के. लाटेलवार | 74-79 |
| 19 | ग्रामीण कवितेतील जागतिकीकरण | डॉ. अशोक रा. इंगळे | 80-84 |
| 20 | अविनाशी फुले | शिवाजी रघुनाथ मोतीबोणे | 85-90 |
| 21 | 'महात्मा' सर्जनशील लेखकाची संधोधनात्मक कादंबरी | प्रा. डॉ. विनोद राठोड | 91-94 |
| 22 | स्त्री- प्रतिमा आणि प्राचीन मराठी साहित्य | प्रा. कविता राजाभोज | 95-98 |

# स्त्री–प्रतिमा आणि प्राचीन मराठी साहित्य

प्रा. कविता राजाभोज
एस.एस. गर्ल्स कॉलेज, गोंदिया
पत्ता : विठ्ठल नगर, अंसारी वार्ड, गोंदिया, महाराष्ट्र (India)
ईमेल : parthkavita@gmail.com भ्रमणध्वनी : ९२८४७६३८८४

मराठी साहित्यातील स्त्री–प्रतिमेचा विचार करत असतांना प्रथमत: भारतीय साहित्यातील स्त्री प्रतिमेची पार्श्वभूमी पाहणे आवश्यक ठरते, कोणत्याही साहित्याची पार्श्वभूमी पाहायचे झाल्यास सर्वप्रथम नजरेसमोर येतो तो महाकाव्याचा कालखंड आणि त्यातील विविधांगी चित्रण. याचे कारण नव साहित्याचा जन्मच प्राचीन, पूर्व साहित्याच्या ग्रहाग्रह, समाजधारणा, सांस्कृतिक घडण, यांच्या पार्श्वभूमीवर होऊन तत्कालीन परिवर्तनाचे साद–पडसाद टिपत होत जातो: कधी साहित्य जुन्याचे स्विकारात्मक तर कधी आधुनिकतेमुळे नकारात्मक होत जाते पण निर्मिती मात्र जुन्याच्या आधारवर होते एवढे निश्चित.

जगातील कोणतेच साहित्य याला अपवाद नाही त्यामुळे हेच सूत्र मराठी साहित्यालाही लागू पडते. मराठी साहित्याचे प्राचीन आणि अर्वाचीन अशा दोन प्रकारात विभागणी करून प्राचीन चे संत, पंत, तंत असे तीन प्रकार पडतात पण अर्वाचीन साहित्याचे मात्र अभिव्यक्तीनुसार कथा, कादंबरी, नाटक, काव्य असे वर्गीकरण केले असले तरी आशयानुसार अनेक प्रकार आहेत. यात दलित साहित्य, ग्रामीण साहित्य, जनवादीसाहित्य, स्त्रीवादी साहित्य, मुस्लिम मराठी साहित्य हे ठळक प्रकार म्हणून सांगता येतील. याविविध साहित्यातील स्त्री प्रतिमाही अनेक रंगी आहेत हे आपल्याला अभ्यासांती दिसून येते. पण प्राचीन साहित्यातील स्त्रीप्रतिमा मात्र पारंपारिक, रूढीप्रिय सौंदर्यवती अशी असली तरी कुलवती हा मुख्य गुण तिच्यात असणे गरजेचे होते. स्वत: ज्ञानेश्वर आपल्या ज्ञानेश्वरीत स्त्री प्रतिमेचे उपयोजन अनेक ठिकाणी करतात.

साहित्य आणि शांती । हे रेखा दिसे बोलती । जैसे लावण्य गुणकुलवती । आणि पतिव्रता ।।

अशा आदर्श स्त्रिची प्रतिमा अनेक ठिकाणी पाहवयास मिळते. अशा प्रकारे प्राचीन साहित्यातील स्त्री प्रतिमेचा विचार करावयाचा असेल तर खालील मुद्दयानुसार करणे गरजेचे वाटते.

- महाकाव्यातील स्त्री प्रतिमा
- महानुभाव साहित्यातील स्त्री प्रतिमा
- संत साहित्यातील स्त्री प्रतिमा
- पंडिती साहित्यातील स्त्री प्रतिमा
- तंत, शाहिरी साहित्यातील स्त्री प्रतिमा

## महाकाव्यातील स्त्री प्रतिमा :

महाकाव्य आणि इतर धार्मिक ग्रंथातून स्त्रीयांचे वर्णन दुहेरी स्वरूपाचे दिसून येते. रामायण या महाकाव्यात एकीकडे सितेचे, महत्व सांगून तिच्यामुळे रामायण घडते असे अगाध महत्व भासविण्यात येते तर दुसरीकडे ढोल पशु शुद्र और नारी । सब ताडन के अधिकारी असे म्हटले आहे. सुष्ट आणि दुष्ट अशा दोन्ही प्रकारात स्त्री–पुरूषांचे चित्रण असेल हे मान्य करणे भाग असले तरी तुलसीदासांची ही उक्ती स्त्रीयांतील पशूतेचेच दर्शन घडविते. शूर्पणखा, कैकयी, मंथरा या खल स्त्रियांचे चित्रण तर सिता, सुलोचना, सुमित्रा, उर्मिला, तारा, रूमा या सारख्या नायिकाही आहेत तेव्हा तुलसीदासांनी काढलेले हे उद्गार स्त्रिया आणि शुद्र यांचे अस्तित्वच नाकारणारे आहे.

दुसरे महाकाव्य महाभारत, यातही द्रोपदी ही नायिका असली तरी सतत दु:खी, शापीत दाखविलेली आहे. एखादया वस्तू अथवा राज्यासारखे पणात जिंकणे, पाच पुरूषांचा पतींचा स्विकार, जुगारात पणाला लावणे, कौरवांनी दासी म्हणून अब्रुचा बाजार मांडणे, वस्त्रहरणाच्या रूपाने विटंबना आणि शेवटी तर तिच्या पाचही पुत्रांची हत्या. महाकाव्याची प्रबल नायिका असूनही कुठेही स्त्रित्वाच्या गौरवाची अथवा माणूस असण्याची भूमिका तिच्या वाटयाला आली नाही. स्वत: द्रोपदीनेच पत्नीला पणाला कसे लावता येईल ? हा प्रश्न विचारून, मी वस्तू नाही, व्यक्ति आहे का व्यक्तिवादी प्रश्न उपस्थित केला आहे. देवकी, कुंती, गांधारी, सत्यवती, अहिल्या याही

अशाच व्यथेने पोळलेल्या आहेत. असे चित्रण असले तरी ह्या नायिका साहित्याच्या आदर्श आहेत. द्रौपदीने पाच पतींचा स्विकार करुन बंडखोरीही केली आहे. पतीची आज्ञा महत्वाची माननारी पतिव्रता हा समाजातील आदर्श या नायिका तंतोतंत पाळताना दिसतात. द्रौपदी अथवा सिता ह्या नायिकांचे आदर्श आजच्या स्त्रियांच्या जीवनातील आदर्शतत्वे ठरतील का ? कोणता समाज एका पत्नीचे पाच पती मान्य करेल अथवा सिते सारखा वनवास कोणती स्त्री पत्करेल. सत्यवती किंवा कुंती या कुमारी मातेचा स्विकार समाज कितपत करतो.

पूर्वमिमांसा, धर्मशास्त्र, मनुस्मृती यातील स्त्रीदास्याचे समर्थनच केले आहे. मनुस्मृतीने तर समाजाची सुव्यवस्था लावतांना सर्व नियम–बंधने स्त्रियांसाठी आवश्यक मानली आहेत. कोणताही दोष नसतांना अहिल्येला शिळा व्हावे लागते तर पती आंधळा म्हणून कधी डोळयावर पट्टी बांधावी लागते. आजच्या परिस्थितीत डोळयावर पट्टी बांधणे जमेल काय ? बायबल सारख्या ग्रंथातही स्त्रिविषयीचा तिरस्कार, स्त्रियांना कमी लेखण्याचे अनेक उदाहरणे आढळतात. बायबलच्या न्यू स्टेटमेंट या भागात सेंट पॉल म्हणतात की, ''स्त्री ही पुरूषापेक्षा व इतर प्राण्यांपेक्षा खालच्या जातीची आहे. पुरूष तिच्याशी संबंध ठेवतो कारण त्याला वंश पुढे चालवायचा आहे केवळ त्यासाठीच स्त्रीची गरज लागते. स्त्रिचा पुरूषावर काहीही व कसलाही प्रभाव पडत नाही कारण ती अतिशय क्षुद्र आहे.'' अर्ध्या जगावर राज्य करणाऱ्या धर्मग्रथांतील हे स्त्रीचित्रण समाजातील स्त्रियांची अवस्था स्पष्ट करते.

प्राचीन साहित्यात स्त्रियांची प्रतिमा अशी अवतरली असली तरी अर्धनटनारेश्वराच्या रूपात अवतरलेली भारतीय संस्कृतीतील ही प्रतिमा स्त्री–पुरूष समानतेचा बिगुल वाजविणारी, स्त्री–पुरूष समानतेची क्रांती करणारी मोठी विचारसरणी होय. तसेच स्वयंवर प्रथा राजसत्तेत सहभागीता या विचारसरणीवर आधारीत तत्वज्ञान तत्कालीन समाजात रूजले असते तर स्त्रियांची दुय्यम अवस्था थोडीफार आटोक्यात येऊन साहित्यात आलेले चित्रण वेगळे असते.

लोकसाहित्य हा समाजाच्या व्यावहारिक चालत्याबोलत्या घडामोडींचा सांस्कृतिक इतिहास असून लोककथा या प्रकाराने स्त्रियांचे चित्रण जून्या ग्रंथासारखेच उतरले आहे. दैवतकथा परिकथा यातील नायिका एकतर अमानवी किंवा दुर्बल, राजकन्या आहेत. पण ओव्या या प्रकारात मात्र स्त्रियांच्या तोंडी आलेली स्त्रीची अवस्था अगदी वास्तविक आहे.

लेकीचा जनम कुणी घातीला वेडयानी । परायाच्या घरी बैल राबतो भाडयानी । हसू नको नारी हसू धरीतो भरम । अस्तूरी जोडी जात मोठं कठीण करम । हसती हसून तुंइया हासूचा भ्रंम मोठा । अस्तुरी जलम खोटा पुरूषात नाही बटा । स्त्रियांचे समाजातील स्थान आणि या ओव्या यांचे मिळतेजुळतेपण स्पष्ट झाले आहे.

## महानुभाव साहित्यातील स्त्री प्रतिमा :

मराठी साहित्यातील स्त्री प्रतिमांचा विचार करतांना सर्वप्रथम महानुभाव पंथाने केलेले स्त्रीचित्रण अत्यंत वेगळया रूपात साकारले आहे. आतापर्यंत उपयोगाची व उपभोगाची एक जीवंत वस्तू एवढीच किमंत असलेल्या स्त्रीला या पंथाने मोक्षाचा व संन्यासाचा अधिकार दिला, तिलाही धर्मतत्वे समजता यावी म्हणून मराठीत रचना केली. स्त्रीने मासिक विटाळ पाळण्याची आवश्यकता नाही असे सांगून तिचे पतितत्व कमी केले म्हणूनच महादाईसा, नागांबिका, आदि संत स्त्रिया जन्माला आल्या असे असले तरी त्यांची स्त्रीविषयक दृष्टी उदार होती असे वाटत नाही. महानुभाव पंथात संन्यासमार्गाला कडकडीत वैराग्याला विशेष महत्व असून वैराग्याला, स्त्रीच बाधक असल्यामुळे चित्रीची स्त्री न पाहावी किंवा 'स्त्री दर्शन मात्रे माजवी' असेही स्पष्ट म्हटले आहे. म्हणजे एकीकडे स्त्री एक जिवात्मा म्हणून आत्मियता तर दुसरीकडे केवळ स्त्री म्हणून 'नरकमार्गस्थ दीपिका' असल्याची ग्वाही महानुभाव साहित्य देते.

भास्करभट्ट बोरीकर यांनी 'शिशुपालवध' या ग्रंथामध्ये रूक्मीणीचे स्त्रीमन अभिजात रसिकतेने रंगवीले आहे तर दुसऱ्या काव्यात उर्वशीच्या उपकथानकाचे निमित्त साधून स्त्रीवर्गाची निर्भत्सना केली आहे. कपटाची कसवटी, पापाची उत्तरवेठ, नरकाची राजवट अशा शिवराळ भाषेचा उपयोग करून शेवटी 'जन्ही सर्वस्वे अनुसरती: तऱ्ही स्त्री एकी आपुली कव्हणी न म्हणावे' असा शेराही मारला आहे. एकदंरीत महानुभावपंथीय कवींनी स्त्रीयांबद्दल आदर व्यक्त केला असून महदंबेविषयी अत्यंत प्रेमळ वचन काढले आहेत. नरेंद्र या कवीने रूक्मीणीस्वयंवर या ग्रंथात रूक्मीणीचे उत्प्रेक्षापूर्ण वर्णन केले असून परब्रम्हाची जोड तिच्या सौंदर्याला दिली आहे. अशा प्रकारे महानुभावीय साहित्यातील स्त्री प्रतिमा विरोधाभास निर्माण करणारी असली तरी टोकाची विरोधी भूमिका निर्माण करणारी नाही.

## संत साहित्यातील स्त्री प्रतिमा :

संताचे साहित्य हे समाज प्रबोधनात्मक असून भक्तीप्रवण होते. समाजजागृतीकरीता संतानी अभंग, ओव्या, आरती, वेद यांचा आधार घेतला असला तरी धार्मिक ग्रंथ आणि महाकाव्याच्या आधारे ग्रंथनिर्मिती केली. यातील पहिलाच महत्वाचा ग्रंथ म्हणजे ज्ञानेश्वरी. या ग्रंथात ज्ञानेश्वरांनी कुठेही स्त्री जातीची निंदा अथवा उपेक्षा करणारी प्रतिमा निर्माण केली नाही. उलट माऊली म्हणून तिचा वारंवार गौरव केला आहे. ज्ञानेश्वरी गीतेचा भाष्यग्रंथ आहे त्यामुळे मूळ गीतेतही स्त्री–निंदा नाही पण पहिल्या अध्यायातच या युध्दामुळे कुलस्त्रिया भ्रष्ट होतील, वर्ण संकर होइल असे सांगीतले आहे. तिसऱ्या अध्यायात क्रामक्रोधाचे वर्णन तर सातव्या अध्यायात मोहमायेचे वर्णन आहे. या सर्व प्रसंगांच्या अनुषंगाने ज्ञानेश्वरांना स्त्री प्रतिमेचे विकृत चित्रण करता आले असते पण तसे न करता उलट दोष स्त्रीत्वाचा नसून स्त्रीववर आसक्त होणाऱ्या पुरूषाचा, त्याच्यातील प्रकृतीचा आहे अशी भावना व्यक्त करून स्त्रीलंपट पुरूषांना समज देण्याचा प्रयत्न केला आहे. ज्ञानेश्वरांना स्त्रीयांतील मातृत्वाचेच दर्शन होते म्हणून योगमार्गासारखा खडतर मार्ग सांगतानाही त्यांनी मातृत्वसुखाची योजना केलेली आहे.

योगसुखाचे सोहळे । सेवका दावीसी स्नेहाळे ।। सोंह सिध्दीचे लळे । पाळीसी तू ।। स्त्रीच्या कोणत्याही रूपाचे वर्णन असले तरी ज्ञानेश्वर ते अत्यंत समर्पक शब्दात रेखाटतात. पत्नी पतिव्रतेचे चित्र इतक्या समरसतेने रेखाटले की ज्ञानेश्वर संसारी पुरूष असावे असे वाटते.

हे असो वनिता आपुली । कुरूप जरी जाहली । तरी भोगिता ते चि भली । जिया परी ।। किंवा परि धर्मपत्नी धांगडी । पोसिता जरि एकी ओढी तरि का अपरवडी । आणावी आंगा ।।

असे बाहेरच्या स्त्रियांचे वर्णन असूनही स्त्री निंदा नाही. आपल्या पतीवर निस्सीम प्रेम करणारी, लावण्यं मयी मार्दवता, पातीव्रत्य जोपासणारी, आपल्या मानीपणामुळे सवत सहन न करणारी, पतीच्या आधीच मृत्यूची इच्छा धारण करणारी, आपल्या अपत्याचे हसतमुखाने सर्व सहन करणाऱ्या स्त्रीचे वत्सलरूप असे अनेकविध रूप ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरीत रेखाटले आहे. अमृतानुभवामध्ये प्रकृती आणि पुरूष या दोहोतील साम्य सांगून स्त्री–पुरूष समानतेचा पुरस्कार केला आहे. स्त्री पुरूष नामभेदे । शिवपण येकलें नांदे । जग सगळे अगाधे । पणे जिहीं ।। तर अभंगवाणीत प्रेयसी, विरहोणी, अशी कितीतरी भावमोहन रूप रंगविली आहेत.

ज्ञानेश्वरांसोबत तुकाराम, एकनाथ, यांच्याही संत साहित्यात स्त्रियांची वर्णने आहेत. एकनाथ प्रंपचात राहून विठ्ठल भजावा असे म्हणतात तर दुसरीकडे नको स्त्रियांसी बोलणे । नको स्त्रियांसी भेटणे । स्त्री देखतांचि पळणे । उठाउठी ।। असे वर्णन करून मला दादला नको ग बाई असा अंभगही रचला आहे. संत तुकारामांनी स्त्रियांचा तो संग नको नारायणा काष्ठ या पाषाण मृत्तीकेच्या असे स्त्रीचित्रण केले आहे. संत रामदास स्वामींनी मात्र स्वत:चा स्त्रीविषयक दृष्टीकोन अधिक उदार ठेवला असे म्हणता येते कारण त्यांनी आपल्या संघटनेत अनेक शिष्याही समाविष्ट केल्या होत्या आणि

नाना पुरूषांचे जीव । नाना स्त्रियांचे जीव । येवुचि परी देहभाव । वेगळाले ।। असे उद्‌गार काढले आहेत. कला कवी मुक्तेश्वर यांनी आपल्या कलावृत्तीमुळे द्रौपदी, शंकुतला, दमयंती, सावित्री, शर्मिष्ठा, उत्तरा यांच्या शृगांरीक वर्णनासोबतच 'बहु हासणें बहु बोलणे । सदा हांसत गोष्टी करणे । परतपरतोनि निरखणे । हे कुलक्षण कुलवंते । असा उपदेशही केलेला आहे. अशा प्रकारे संत साहित्यातील स्त्रीप्रतिमा ज्ञानेश्वरांचे साहित्य वगळता मिश्रीत स्वरूपाने अवतरली आहे असे म्हणता येते.

## पंडिती साहित्यातील स्त्री प्रतिमा :

पंडिती काव्य हे अभिजात संस्कृत काव्याचे पुनरूजीवन आहे. पंडिती काव्य हे महाकाव्याचे अतिशय उत्कृष्ट असे रूपांतर भाषातर असून यातील वर्णन विद्‌वत्तापूर्ण आहे. उदा. रूक्मीणी, उषा, सिता, राधा या मुग्दाधी अशा षोडस नायिका रंगविल्या आहेत, या नायिकांच्या चंचल सख्या, विविध दूतरूपी सख्या, प्रेयसी, विरहीणी अशी नानाविध मुग्ध रूपे स्त्रीयांची वर्णन केलेली आहेत. कवी विठलाने आपल्या 'रसमंजीरी' या ग्रंथात अत्यंत मुग्ध अशा षोडस नायिका रंगविल्या आहेत. तर बिल्हण चरित्रात तेच वर्णन अतिरेकी व उत्तान झाले आहे. रघुनाथ पंडितांनी दमयंतीच्या रूपातील नायिकेचे वर्णन अत्यंत विलोभनीय केले आहे. चतुर विनयशील प्रियकरावर निष्ठा ठेवणारी रतिरूपजयंती अशी नायिका आहे. मोरोपंतांनी पतिव्रता किर्तन असे स्त्रोत लिहून सावित्री, अनसूया, अहल्या, रूक्मीणी, मदाळसा अशा आदर्श स्त्रियांचे महत्व सांगून त्यांना नमन केले आहे. मध्वमुनेश्वर यांनी काळे तुझे बाल राधे । गोरे तुझे गाल विद्या शिसफुल भाळी शोभे । भांगी सरस गुलाल

मध्वमुनीश्वर म्हणतो तुझे । रंगीत अधर रसाळ ।। असे शृंगारीक वर्णन करून स्त्रीची प्रतिमा रेखाटली आहे. माधवस्वामी यांनीही असेच शृंगारीक व सुंदर स्त्री प्रतिमा चित्रीत केली आहे. मोरोपंतानी मात्र आदर्श स्त्रियासोबतच पुरूषांच्या वीरत्वाला आवाहन देणारी स्त्री प्रतिमा निर्माण केली आहे. हे स्त्री नव्हे, प्रतिष्ठा तुमची जरि ईस सोडिंता पाणी । 'धर्मेचार्थेच' असे वदला का प्रथम जोडितां पाणी ।। असे नाटयात्मक आवाहन द्रौपदी भीमाच्या वीरत्वाला देते. यासोबतच स्त्रीयांना गाता येतील असे स्त्रीगीतेही लिहिली आहेत.

तंत शाहिरी साहित्यातील स्त्री प्रतिमा :

आता पर्यतच्या साहित्यातील, पारंपारिक स्त्री प्रतिमेला बदलविण्याचे कार्य शाहिरांनी केलेले आहे. शाहिरी काव्यातील लावणी हा प्रकार सामाजिक जीवनातून निर्माण होऊन स्त्रीयांच्या भावनिकतेचे वर्णन आलेले आहे. मराठमोळी रूपगर्विता, निपुत्रिका, विधवेची व्यथा, पतीच्या दोन बायकांचे वर्णन, कर्तव्यदक्ष नायिका आणि खोटारडया पतीचे खरे रूप लक्षात आणून देणारी बेधडक पत्नी या साहित्यप्रकारात आहे.

म्या म्हटले हा चक रूपया दिसतो माल खरा ।

वाजून जो पाहतो तो आंत तांब्याचा भुरभुरा । असे तर समाजाचे बदलते चित्रण पतिव्रता ही उपाशी मरती तिला मिळेना सावली, चंचल नार बांधीत असे नवे घर एक दरसाली । अशा जीवनातील कटु अनुभवाला सामोरे जात असलेली स्त्री तर

नग दागिने घडवा मजला रोकड हुंडी कसा

माझ्या माहेरी जाऊन राहू बिनघोराने असा असा पतीकडे आग्रह धरणाऱ्या दुधड पत्नी चे चित्रण परशराम यांनी केले आहे. झाली तरूणपणाची धुळ । पति नाही सेजेवरी । सुंदरा रडे मुळमुळ । अशी विरहीणी रामजोशी यांनी रंगविली आहे. होनाजी बाळा याच्या लावणीमध्येही पती विरहाने झुरणारी पत्नी, विरहात एकनिष्ठ राहणारी पतिव्रता, प्रेमावर नितांत श्रध्दा ठेवणारी प्रेयसी हे सर्व चित्रण स्त्रियांच्या बाबतीत आलेले आहे.

याच साहित्याचा दुसरा भाग म्हणजे बखर राजकीय जीवनातून निर्माण झाली असली तरी स्त्रियांचे विशेषत: राजघराण्यातील स्त्रियांच्या वीर, एकनिष्ठ वृत्तीचे दर्शन घडते. होळकर घराण्यातील भागीरथीबाई, गौतमाबाई, बळवंतराव मेहेंदळे यांची सती जाणारी पत्नी अशा विविध वीर स्त्रीयांचे चित्रण असून लावणी अथवा संतसाहित्यातील चित्रणापेक्षा वेगळे आहे.

अशाप्रकारे एकंदर प्राचीन मराठी साहित्यातील स्त्री प्रतिमा पाहताना लक्षात येते की, या साहित्य प्रकारातील स्त्री प्रतिमा हया पारंपारीक, धार्मिक वळणाच्या आहेत. सामाजिक चौकटीच्या आत राहूनच स्त्रीजीवनाचे सार्थक आहे असे या साहित्याचे प्रतिपादन आहे हे लक्षात येते याला अपवाद म्हणजे तंत साहित्य. तसे महानुभाव पंथानेही स्त्रीयांना समाजात महत्वाचे स्थान देउन त्यांचा ईश्वरभक्ती, मोक्षप्राप्तीचा अधिकार मान्य केला होता. संत साहित्यातील स्त्री प्रतिमा कधी पुज्य तर कधी त्याज्य ठरते. पंडिती काव्यात स्त्रीयांच्या शृगांरीक प्रतिमा रेखाटण्यात आल्या आहेत. तंत साहित्यात मात्र स्त्री एक व्यक्ती म्हणून आलेले चित्रण हे बदलते स्त्री चित्रण आहे. या साहित्य प्रकारात स्त्री ही शृगांराच्या घटकाबरोबरच भावनिक, मानसिक घटकासह अवतरते हे महत्वाचे प्राचीन मराठी साहित्यातही आहे. स्त्री चित्रण काळानुसार बदललेले दिसून येते.

## संदर्भ ग्रंथ सूची :

१) कुळकर्णी द.भि : प्रतीतिविश्रांती, विजय प्रकाशन नागपूर, १९९२.
२) नासिराबादकर ल.रा. : प्राचीन वाङ्मयाचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर, स.आ.१९९७
३) पाटिल शोभा : स्त्रीवादी विचार आणि समिक्षेचा मागोवा, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे २००७.
४) लांडे सुमती (संपा) : स्त्रीवाद, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, पुणे, २००७.
५) सरदार गं.बा. : संत वाङ्मयाची सामाजिक फलश्रुती, श्रीविधा प्रकाशन, पुणे, च.आ.१९८२.

❖❖❖